नांदेड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना, नांदेड
या संघटनेस शासन मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. संघटना १५१७/प्र.क्र.२९२/१६-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ मे, २०१८

वाचा:-

१. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र क्र. २०१६/मशाका-१/आस्था-४/प्रक., दि.५.१.२०१७
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आरजीए-१०८४/सीआर-९९/१६-अ, दि. १०.१२.१९८४ व शा.प. क्रमांक संघटना १५१४/प्र.क्र.२५६/१६-अ, दिनांक २७.३.२०१५
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संघटना १५१४/प्र.क्र.२५०/१६-अ, दिनांक १८.३.२०१५

प्रस्तावना:-

शासकीय कर्मचाऱ्यांच्या (औद्योगिकेत्तर) संघटनांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९, नियम ३० व सदर नियमावलीच्या परिशिष्ट, अनुसूची एक व अनुसूची दोन मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच "नवीन आदर्श नियम" ची घटना व नियमांच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येते. त्याकरिता अनुसरावयाची कार्यपध्दती संदर्भांकित ३ येथील शासन परिपत्रक दिनांक १८.३.२०१५ अन्वये विहित करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी नांदेड यांनी त्यांच्या दिनांक ५.१.२०१७ च्या पत्रासोबत विहित नमुन्यातील अर्जान्वये **" नांदेड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना, नांदेड"** या संघटनेला (ज्याचा यापुढे “सदर संघटना” असा उल्लेख केला आहे) शासन मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम २९ व ३० मधील तरतूदी अंतर्गत मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

शासन निर्णय:-

"नांदेड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना, नांदेड" या शासकीय कर्मचा-यांच्या (औद्योगिकेतर) संघटनेस महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ नियम क्रमांक २९ व ३० तसेच अनुसूची दोन येथील “नवीन आदर्श नियमावली”तील नियम क्रमांक १ ते २९ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून तसेच, खाली विहित केलेल्या अन्य अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

१. सदर संघटना ही महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली संलग्न असेल.
२. महसूल व वन विभागाचे प्रभारी सचिव सदर संघटनेच्या दफ्तर तपासणी, संघटनेच्या निवडणुका, पदाधिकारी या संबंधात वाद उद्भवल्यास सक्षम अधिकारी राहतील. तसेच ते आपल्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यास (जो उप सचिवांचे हुद्द्याच्या अधिकाऱ्यांपेक्षा कनिष्ठ नाही) या कार्यासाठी नामनिर्देशीत करु शकतील.
३. नांदेड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना ही गट- क या वर्गाचे प्रतिनिधित्व करते. त्या वर्गातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी २५ टक्के पेक्षा कमी नाही एवढे सदस्य संघटनेचे कायम सदस्य असावेत.

४. सदर संघटनेस कोणत्याही राजकीय पक्षाशी किंवा राजकीय संघटनेशी संबंधीत किंवा राजकीय चळवळीमध्ये सहभागी होता येणार नाही. सदर संघटना सदस्यांच्या वतीने कोणतेही प्रचारात्मक किंवा प्रक्षोभक साहित्य, वृत्तपत्रातून किंवा अन्यथा प्रकाशित करणार नाही किंवा संघटनेच्या सदस्यास प्रकाशित करण्यास अनुमती देणार नाही.

५. सदर संघटनेचे कार्यवृत्त-पुस्तक, सदस्यांची नोंदवही, लेखा पुस्तके आणि प्रमाणके आणि इतर सर्व कागदपत्रे, यासंबंधात शासनाने प्राधिकृत केले असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यांना तपासणीसाठी खुली ठेवील.

६. सदर संघटनेने, शासन यासंबंधात प्राधिकृत करील, अशा अधिकाऱ्याने आवश्यक म्हणून ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत संबंधित विभागाच्या सचिवांना, आपल्या सदस्यांचे वार्षिक विवरणपत्र आणि लेखापरीक्षित लेख्यांची प्रत सादर केली पाहिजे. तसेच विहित कालावधीत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका घेणे बंधनकारक राहील.

७. "नांदेड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना" या संघटनेने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्रमांक २९ व ३० मधील विहित अटी व शर्ती तसेच उपरोक्त नमूद अट क्रमांक ३ ते ६ चे उल्लंघन केल्यास संघटनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

२. सदर संघटनेमार्फत उपरोक्त विहीत अटींचे योग्य प्रकारे पालन करण्यात येत आहे, याबाबत महसूल व वन विभाग यांनी वेळोवेळी खातरजमा करावी व याकरिता संदर्भ क्र. २ येथील शासन परिपत्रकात नमूद सूचनेनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५०८१४४६२१३८०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram
Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c0832 8de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2018.05.08 14:47:58 +05'30'

(टि.वा.करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-४०० ०३२.
२) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -४०० ०३५.
४) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
६) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८) प्रधान सचिव, (विधान परिषद),महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
९) प्रधान सचिव, (विधान सभा), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय विधानभवन, मुंबई.

१०) प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ न्याय शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

११) प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपिल शाखा), मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

१२) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.

१३) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, नविन प्रशासन भवन, १ ला मजला, मुंबई.

१४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, टेलिफोन एक्स्चेंज भवन, कुपरेज, मुंबई.

१५) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई.

१६) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर.

१७) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती).

त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन निर्णय प्रसिध्द करण्यात यावा.

१८) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.

१९) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२०) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),

२१) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये.

२२) उप सचिव, (ई-५), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२ (घटनेच्या व शपथपत्राच्या साक्षांकित प्रतीसह)

२३) श्री.कुणाल रंगराव जगताप, अध्यक्ष, नांदेड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना, नांदेड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना उपहारगृह, जिल्हाधिकारी कार्यालय, परिसर नांदेड. (घटनेच्या व शपथपत्राच्या साक्षांकित प्रतींसह)

२४) निवड नस्ती/कार्यासन १६-अ.